# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ

कृषि नगर, वसमत रोड,
परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र)

| | | | |
|---|---|---|---|
| ई-मेल | : reg_mau@rediffmail.com | दूरध्वनी | : (०२४५२) २२९७५५ |
| वेबसाईट | : www.vnmkv.ac.in | फॅक्स | : (०२४५२) २२९७५५,२२३५८२ |


क्र.२०२०/प्र.क्र.११/आस्था-६ दिनांक १८.११.२०२०

वाचा : १.शासन निर्णय परिवि/२७१५/प्र.क्र.३०२ दिनांक २९.०२.२०१६

**परिविक्षाधीन कालावधीबाबत...**

## परिपत्रक

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातंर्गत सर्व कार्यालयप्रमूख यांना कळविण्यात येते की, परिविक्षा कालावधीचा प्रस्ताव विद्यापीठास सादर करतांना शासन निर्णय दिनांक २९.०२.२०१६ अनु.क्र.०२ मधील ०४ च्या अनुषंगाने परिविक्षाधीन अधिकारी/कर्मचारी यांच्या नियुक्तीबाबत न्यायालयीन प्रकरणे सुरु असल्यास (निवड प्रक्रिया,जात वैधता प्रमाणपत्र, आरक्षण इत्यादी) तसेच न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून परिविक्षाधीन अधिकाऱ्याची नियुक्ती झाली असल्यास न्यायालयाचा अंतिम निर्णय होईपर्यत संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांचा परिविक्षाधीन कालावधी समाप्त करण्याबाबतचा आदेश काढता येणार नाही असे नमुद असूनही कर्मचाऱ्याचे परिविक्षाधीन कालावधीचे प्रस्ताव प्राप्त होत आहेत.

उपरोक्त शासन निर्णयानुसार यापुर्वी न्यायालयीन प्रकरणे सुरु असलेल्या कर्मचा-यांचे परिविक्षा कालावधीचा निपटारा झाला असल्यास सदरील आदेश रद्द समजण्यात यावे व तशी नोंद त्यांच्या सेवापुस्तकात घेऊन तद्नुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

तसेच ज्या कार्यालयांना या प्रकरणी परिविक्षाधीन प्रस्तावावर कार्यवाही सुरू आहे असे कळविले आहे अशा बाबतीत न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून परिविक्षाधीन अधिकाऱ्याची/कर्मचाऱ्यांची नियुक्ती झाली असल्यास न्यायालयाचा अंतिम निर्णय होईपर्यत संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांचा परिविक्षा कालावधीचा निपटारा झाल्याबाबतचा आदेश काढता येणार नाही. तेंव्हा अशा कर्मचाऱ्यांचे परिविक्षाधीन कालावधीचे प्रस्ताव न्यायालयीन निर्णय होईपर्यत या कार्यालयास पाठविण्यात येऊ नयेत.

मा. कुलगुरु यांच्या मान्यतेने,

(रणजीत आ. पाटील)
**कुलसचिव**

**प्रतिलिपी खालील अधिकारी यांनी अधिनिस्त कार्यालय प्रमूखांना सदर परिपत्रक निदर्शनास आणून द्यावे.**

संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि)/संचालक संशोधन/संचालक विस्तार शिक्षण/सहयोगी अधिष्ठाता (शिक्षण), विद्यापीठ अभियंता/ नियंत्रक , वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

**प्रत**

प्रभारी अधिकारी,मध्यवर्ती संगणक केंद्र, परभणी यांना देऊन कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

मा. कुलगुरु यांचे खाजगी सचिव, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी